# शिक्षकांसाठी सूचना प्रथम भाषा : मराठी – इ. पहिली

## संकलित मूल्यमापन २ : २०१७–१८

**इयत्ता – पहिली**

**विषय : मराठी**

| लेखी | तोंडी | एकूण गुण |
|---|---|---|
| २० | १० | ३० |

### लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना

- **प्रत्येक प्रश्न कसा सोडवावा ते समजावून सांगावे. उत्तराचा निर्देश मात्र देऊ नये.**

**प्रश्न १) शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**सूचना :**
- यादीतील शब्द मोठ्याने व स्पष्ट वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्यांना शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द :**

| | |
|---|---|
| १) कढई | २) चाफा |
| ३) मिरची | ४) शेत |
| ५) जंगल | |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास एक गुण याप्रमाणे गुणदान करावे.**
हा प्रश्न तपासताना पुढील बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावा. उदा. 'मिरची' ऐवजी 'मीरचि' किंवा 'जंगल' ऐवजी 'जगंल' असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्रश्न २) चित्र पाहा व त्याचे नाव लिही.** (गुण ३)

१) सायकल २) ससा ३) बादली

हा प्रश्न तपासताना लेखननियमांनुसार लिहिणे अपेक्षित नाही.

उदा. बादलि असे लिहिले तरी गुण द्यावा.

**प्रश्न ३) खालील शब्दात लपलेले कोणतेही तीन अर्थपूर्ण शब्द शोधून लिही.** (गुण ३)

वाढदिवस – वाढ, दिवस, वाव, वास, दिस, दिवा.

(एक शब्द लिहिल्यास एक गुण याप्रमाणे तीन शब्दास तीन गुण द्यावेत.)

**प्रश्न ४) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिही.** (गुण ३)

मोर सुंदर **पक्षी** आहे.
त्याची पिसे **रंगीत** असतात.
त्याच्या डोक्यावर **तुरा** असतो.
मोर **पिसारा** फुलवून नाचतो.
(एका बरोबर शब्दास प्रत्येकी एक गुण द्यावा.)

**प्रश्न ५) खालील अक्षरांपासून कोणतेही तीन अर्थपूर्ण शब्द बनव.** (गुण ३)

दिलेल्या अक्षरांपासून तयार केलेल्या कोणत्याही तीन अर्थपूर्ण शब्दास प्रत्येकी एक गुण याप्रमाणे तीन गुण द्यावेत.

उदा.- पाऊस, पास, ऊस, मास, पार, धर, मार, सर, ऊर, रमा, माऊ, रस.

**प्रश्न ६) पुढे दिलेल्या चित्रात कोण काय करत आहे ते लिही.** (गुण ३)

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखी)

**उद्दिष्ट :** स्वतःच्या शब्दांत लिहिता येते का हे तपासणे.

**गुणदान : प्रत्येक चित्राच्या योग्य उत्तरास एक गुण द्यावा.**

- चित्रांत दिसणाऱ्या **क्रियेचे वर्णन** पूर्ण वाक्यात असेल तरच गुण द्यावेत.
- उदा. मुलगा आहे, मग आहे, पाणी आहे, बादली आहे. अशा वाक्यांना गुण देऊ नयेत. 'मुलगा अंघोळ करत आहे/ करतो/अंघोळीला बसला आहे.' यांसारखी वाक्ये पूर्ण क्रिया दर्शवितात. अशाप्रकारे पूर्ण क्रिया दर्शविणाऱ्या वाक्याला एक गुण द्यावा.
  (स्थानिक भाषा स्वीकारावी.)
- येथे मुलांनी लेखननियमांनुसार लिहिणे अपेक्षित नाही.

## तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना

**प्रश्न ७) उतारा ऐकून प्रश्नांची उत्तरे देणे. (तोंडी)**

**प्रश्नकर्त्यांसाठी सूचना :**

- हा प्रश्न तोंडी असल्याने प्रत्येक विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारावयाचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.
- मुलाने उत्तर न दिल्यास प्रश्नाचे पुन्हा एकदा वाचन करावे.
- विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे काही मुले पर्याय वाचून दाखविण्याआधीच देतात अशा वेळी मुलाचे उत्तर चुकले तरच पर्याय वाचून दाखवावेत.
- उतारा वाचून दाखविण्याआधी खालील सूचना मुलांना द्याव्यात, मग उतारा वाचून एक-एक प्रश्न विचारावा.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना : आता मी तुला एक उतारा वाचून दाखविणार आहे. तो नीट ऐक. वाचून झालं की मी तुला काही प्रश्न विचारणार आहे त्याची उत्तरे तू द्यायची.**

**उतारा :**

**कावळा, काव काव करत आला. राणी अंगणातच उभी होती. कावळ्याला म्हणाली, 'कावळेदादा कावळेदादा, तुला खूप भूक लागली का रे?' थांब हं! मी तुला भाकरीचा तुकडा देते. राणीने भाकरीचा तुकडा आणला; आणि कावळ्याला दिला. कावळ्याने भाकरीचा तुकडा चोचीत धरला आणि उडून गेला. राणीला खूप आनंद झाला.**

**दुसऱ्या दिवशी चिमणी आली. राणीला खूप मजा वाटली. तिने आनंदाने चिमणीला दाणे टाकले. दाणे खाऊन चिमणी भुर्रकन् उडून गेली. चिमणी व कावळा रोजच येऊ लागले. राणीशी त्यांची छान गट्टी जमली.**

**आता मुलाने ऐकलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.**

| | | योग्य उत्तर | गुण |
|---|---|---|---|
| **तोंडी प्रश्न १)** | **राणी कोठे उभी होती?**<br>अ) घरात ब) अंगणात क) बागेत | (ब) | (१) |
| **तोंडी प्रश्न २)** | **राणीने कावळ्याला व चिमणीला काय काय दिले?**<br>(राणीने कावळ्याला भाकरीचा तुकडा व चिमणीला दाणे दिले असे उत्तर दिल्यास पूर्ण गुण द्यावेत. फक्त भाकरीचा तुकडा किंवा दाणे यापैकी एक उत्तर दिल्यास एक गुण द्यावा.) | | (२) |
| **तोंडी प्रश्न ३)** | **राणीची कोणाकोणाशी गट्टी जमली?**<br>कावळा व चिमणी असे उत्तर दिल्यास पूर्ण गुण द्यावेत. दोन्हीपैकी एकच नाव सांगितल्यास एक गुण द्यावा. | | (२) |

**प्रश्न ८) खालील मजकुराचे प्रकट वाचन करून घेणे.** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यांसाठी सूचना :**

- हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून वाचन घ्यावे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना :**

**मी तुला एक मजकूर वाचायला देणार आहे. तो मजकूर स्पष्ट व मोठ्या आवाजात वाच.**

**आईने बाजारातून फुगे आणले.**
**ताईला, दादाला व चिमुला दिले.**
**सगळे घराबाहेर खेळायला गेले.**
**दादा आणि ताईचा फुगा फुटला.**
**चिमुला वाईट वाटले.**

**वाचनासाठी गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ५ | अर्थ लक्षात घेऊन वाक्यांचे, मजकुराचे अचूक व स्वराघातासह सलगपणे केलेले वाचन. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. मजकुराचे/वाक्याचे प्रयत्नपूर्वक वाचन. अडखळत परत परत केलेले वाचन चालेल. |
| ३ | मदत न करता काही शब्दांचे केलेले वाचन, वाचनातून वाक्याचा बोध होत नाही. |
| २ | मदत करून काही शब्दांचे केलेले वाचन. |
| १ | काही अक्षरांचे वाचन, मदत करूनही शब्दांचे वाचन केले नाही. |
| ० | मुलाने वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |

■■■